**कामठी-कोराडी, जि.नागपूर तसेच बल्लारपूर, पोंभुर्णा व मूल, जि.चंद्रपूर तालुका क्रीडा संकुलासाठी निधी वितरित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः पुमाप्र-२६१८/प्र.क्र.११०/क्रीयुसे-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ मार्च, २०१९.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.राक्रीधो २००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च, २००३.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो २००९/(प्र.क्र.२५/०९)/ क्रीयुसे-१, दिनांक २१ मार्च, २००९.
३) सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.ताक्रीसं/पुमानिवि/१५-१६/५१०/का-९/८९५१, दिनांक २३ मार्च, २०१६.
४) सह संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.ताक्रीसं/सुप्रमा/विद्युत/१७-१८/का-९/१९१७, दिनांक ३० मे, २०१८.
५) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.ताक्रीसं/सुप्रमा/१८-१९/का-९/२२९३, दिनांक २५ जून, २०१८.
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पुमाप्र-२०१८/प्र.क्र.११०/क्रीयुसे-१, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८.
७) सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.ताक्रीसं/पुमा/निमा/२०१८-१९/ का-९/६२६९, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९.

**प्रस्तावना :-**

राज्याचे क्रीडा धोरण २००१ अंतर्गत तालुका स्तरावर तालुका क्रीडा संकुल उभारण्याची योजना दिनांक २६ मार्च, २००३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. दिनांक २१ मार्च, २००९ च्या शासन निर्णयानुसार तालुका क्रीडा संकुलाची अनुदान मर्यादा रु.२५.०० लाखावरुन रु.१.०० कोटी एवढी करण्यात आली आहे.

२. तालुका क्रीडा संकुल कार्यक्रमांतर्गत कामठी-कोराडी, जि.नागपूर तसेच बल्लारपूर, पोंभुर्णा व मुल, जि.चंद्रपूर तालुका क्रीडा संकुलासाठी पावसाळी (जुलै, २०१८) अधिवेशनामध्ये रु.१४६२.४४ लक्षची तरतूद पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. दिनांक २६.०३.२००३ च्या शासन निर्णयान्वये राज्य क्रीडा विकास समितीची स्थापना करण्यात करण्यात आली आहे. सदर समितीस विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुलातील विविध क्रीडा सुविधांसाठी तांत्रिक, प्रशासकीय व वित्तीय

मान्यता देण्याचे अधिकार आहेत. सदर राज्य क्रीडा विकास समितीच्या दि.२९.०२.२०१६ व १५.१२.२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार क्रीडा संचालनालयाच्या दिनांक २३.०३.२०१६ च्या पत्रान्वये कामठी-कोराडी तालुका क्रीडा संकुलाच्या रु.६१०.७२ लक्ष व दिनांक २५.०६.२०१८ च्या पत्रान्वये बल्लारपूर तालुका क्रीडा संकुलाच्या रु.२८३४.५२ लक्षच्या अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. तसेच क्रीडा संचालनालयाच्या दिनांक ३०.०५.२०१८ च्या पत्रान्वये मुल, बल्लारपूर, पोंभुर्णा व चिमूर जि.चंद्रपूर तालुका क्रीडा संकुलांच्या अनुक्रमे रु.१००.३९ लक्ष, ६४८.४४ लक्ष, रु.१०६.३५ लक्ष व रु.९७.१० लक्षच्या विद्युतीकरण अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार क्रीडा व युवक संचालनालयाच्या संदर्भाधीन क्र.४ च्या पत्रान्वये कामठी-कोराडी, जि.नागपूर तसेच बल्लारपूर, पोंभुर्णा व मुल, जि.चंद्रपूर तालुका क्रीडा संकुलांसाठी पावसाळी (जुलै, २०१८) अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.१४६२.४४ लक्ष तरतूदीपैकी ७०% रक्कम रु.१०२३.७०८ लक्ष दिनांक २२.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केली आहे. उर्वरित १०% रु.१४६.२४४ लक्ष (८०% मर्यादेत) इतकी तरतूद वितरीत करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्याप्रमाणे कामठी-कोराडी, जि.नागपूर तसेच बल्लारपूर, पोंभुर्णा व मुल, जि.चंद्रपूर तालुका क्रीडा संकुलासाठी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेली तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

क्रीडा प्रशिक्षण केंद्राची आस्थापना या कार्यक्रमांतर्गत योजनेकरीता सन २०१८-१९ या वर्षाकरिता पावसाळी (जुलै, २०१८) अधिवेशनामध्ये कामठी-कोराडी, जि.नागपूर तसेच बल्लारपूर, पोंभुर्णा व मुल, जि.चंद्रपूर तालुका क्रीडा संकुलांसाठी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.१४६२.४४ लक्ष तरतूदीपैकी रु.१४६.२४४ लक्ष (रुपये एक कोटी शेहेचाळीस लक्ष चोविस हजार चारशे फक्त) एवढी तरतूद खालील विवरणामध्ये दर्शविल्याप्रमाणे वितरीत करुन सदर तरतूद आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदरचा निधी ज्या प्रयोजनाकरिता / बाबींकरिता मंजूर केला आहे, त्याच बाबींकरिता खर्च करण्यात यावा.

| अ.क्र. | तालुका क्रीडा संकुलाचे नांव | हिवाळी अधिवेशनात मंजुर निधी (रु.लक्ष) | वितरणास प्रस्तावित निधी (रु.लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | कामठी-कोराडी, जि.नागपूर | १५०.०० | १५.०० |
| २ | बल्लारपूर, जि.चंद्रपूर | ११०५.६९ | ११०.५६९ |
| ३ | पोंभुर्णा, जि.चंद्रपूर | १०६.३६ | १०.६३६ |
| ४ | मुल, जि.चंद्रपूर | १००.३९ | १०.०३९ |
| **एकुण** | | **१४६२.४४** | **१४६.२४४** |

२. सन २०१८-१९ मध्ये क्रीडा प्रशिक्षण केंद्राची आस्थापना याकरीता उपलब्ध झालेल्या रु.३३५२.९१ लक्ष एवढया तरतुदी मधून सदर निधी वितरीत करण्यात यावा.

I. उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आंहरीत करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च मागणी क्रमांक ई-३, २२०४, क्रीडा व युवक सेवा, १०४, क्रीडा व खेळ, (१०) क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना, (१०) (०२) क्रीडा प्रशिक्षण केंद्राची आस्थापना(कार्यक्रम), (२२०४ १७९२), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील या वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून करण्यात यावा.

४. वित्त विभाग दिनांक ०२.०४.२०१८ व २५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहंरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.१, २, ३, ४, ५, ६ व ७ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०११५४६१०४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.01 15:48:35 +05'30'

**( राजेंद्र पवार )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.

२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
९. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०.वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)
११. संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी ( क्रीडा संचालनालयामार्फत),
१२. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई-३२.
१४. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती (क्रीयुसे-१).